# विदेशातील भारतीय कामगारांना संरक्षणासाठी करार : एदुआर्द फालेरो



गोवा दि. २९.आक्टो (सी.एन.आय)-विदेशातील भारतीय कामगारांना संरक्षण देण्यासाठी भारत सरकारने बहरीन, जॉर्डन, मलेशिया, कुवेत आणि कतारशी व्दिपक्षीय करारवर सह्या केल्याचे अनिवासी भारतीय व्यवहार आयुक्त एदुआर्द फालेरो यांनी सांगितले.

स्थलांतरीत कामगारांनी त्याची अधिकृत एजंसीमार्फत नियुक्ती झाली का याची खात्री करून घ्यावी आणि त्यांनी आपल्यासोबत विदेशी कामगार किंवा त्यांच्या एजंटने सही केलेल्या कामगार कराराची प्रत ठेवावी, असा सल्ला त्यांनी दिला आहे.

ओव्हरसीस एम्प्लॉयमेंट एजंसी ऑफ गोवाने आग्रेल वोकेशेनल ट्रेनिंग इन्स्टीट्युटच्या सहकार्याने आग्रेल आश्रम वेर्णा येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात चार महिने कालावधीच्या रेफ्रिजेरेशनची एअर कंडीशन मॅकॅनिक वर्ग यशस्वीरीत्या पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना प्रमाणपत्रे वितरित केल्यानंतर प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. ते म्हणाले, निमकुशल किंवा घरात काम करणार्या कामगारांनी भारतीय दूतावासाने रोजगार दाखले सांक्षाकित केलेले आहेत काय याची खात्री करून घ्यावी.

कायदेशीर प्रतीशिवाय स्थलांतरीत कामगारांनी एकही पैसा नियुक्त संस्थांना देऊ नये आणि कोणतीही समस्या असल्यास त्यांनी भारतीय दूतावासाकडे संपर्क साधावा असे ते म्हणाले.

विदेशात भारताचे दूतावास कायदा क्लिनिक चालवितात. त्यात अनुभव असलेले आणि प्रतिष्ठीत स्थानिक भारतीय वकील आहेत असे सांगितले. कुवेतमध्ये कायदा क्लिनिक ३ ते संध्या ५ वा.पर्यंत खुले असतात. मोफत कायदा सल्ला ते उपलब्ध करतात. श्री. फालेरो यांनी गोव्यातील ओव्हरसीस रोजगार संस्था छोटे एका आठवड्याचे विदेशी दिशानिदेशन कार्यक्रम आणि कौशल्य अपग्रेडेशन वर्गींचे आयोजन करीत असल्याचेही त्यांनी सांगितले. विविध सरकारी आणि निमसरकारी संस्थेच्या सहकार्याने अर्ध्यावर शाळा सोडणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी तीन किंवा सहा महिने कलावधीच्या वर्गाचे आयोजन करीत असल्याचे ते म्हणाले. प्लूंबिंग, मोबाईल दुरुस्ती, रेफ्रिजेरेशन, एअर कंडिशन, अन्न उत्पादन आणि होम नर्सिंग असे वर्ग घेण्यात येतात. पेडणे, कळंगुट, केपे, वेर्णा, आसगांव, पर्वरी आणि वेळ्ळी येथे सध्या हे आठ वर्ग सुरू करण्यात आले आहेत, अशी माहिती त्यांनी दिली. ओव्हरसीस एम्प्लॉयमेंट एजंसी ऑफ गोवाचे अध्यक्ष व्हाईस ?डमिरल जॉन सी. डिसिल्वा (निवृत्त) यांचेही यावेळी भाषण झाले. संजय नाईक आणि केगन रॉड्रीगीज यांनी आपले अनुभव कथन केले. कार्यसत्राचे अधीक्षक विन्सेंट फर्नांडिस यावेळी उपस्थित होते. सुरवातीस फादर आल्फ्रेड आल्मेदा यांनी स्वागत केले.